अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शनिवार, दि. १५ जून २०२४ । वर्ष : २२ वे | अंक : २५६ वा | किंमत : ५ रुपये | पाने १२

## नंबर प्लेटची विचारणा केल्यानंतर दोघा पोलिसांनाच शिविगाळ-दमदाटी

**अक्कलकोट** : येथील एसटी बसस्थानक समोर असलेल्या रस्त्यावर वाहतूक नियंत्रणाचे कामकाज करीत असताना मोटारसायकल नंबर प्लेट नसल्याबाबत विचारणा केल्याच्या कारणावरुन मोटारसायकल चालवणाऱ्याने दोघा पोलिसांनाच चक्क शिविगाळ आणि दमदाटी केल्याची घटना मंगळवारी सकाळी पावणे बारा वाजता घडली.

याप्रकरणी अमित हिरा राठोड (रा. शिवाजीनगर तांडा, अक्कलकोट) यांच्या विरोधात अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमी फिर्यादी स्वतः व पोकॉ मुजावर दोघे नेमणूक अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आहेत. अक्कलकोट बसस्थानकासमोर काशीनाथ राम सदाफुले, पंडीत चव्हाण, मुजावर, राठोड हे ट्रॅफिक केसेस करत थांबले होते. विना नंबर प्लेटच्या मोटारसायकलचे चालक अमित हिरा राठोड यास थांबवून पोलिसांनी नंबर प्लेटची विचारणा केली. त्यानंतर त्याने चिडून मला तू ओळखत नाही काय, मी तांड्यात राहतो. पोलिसांना मस्ती आली आहे, विनाकारण गाडी अडवितात असे म्हणून शिवीगाळी करत पोकॉ मुजावर यांच्याशी हुज्जत घातली. दमदाटी करत त्यांचा उजवा हात पिरगाळला. यातील फिर्यादी हे भांडण सोडविण्यास गेले असता त्यांचे अंगावर धावून त्यांची गच्ची पकडली. शासकिय कर्तव्यात अडथळा आणून त्यांना शासकिय कर्तव्यापासून धाकाने परावृत्त करण्याचे उद्देशाने शिवीगाळी, दमदाटी करुन मारहाण केली. तुम्ही माझ्यावर गुन्हा दाखल केला तर मी तुमचे नाव घालून आत्महत्या करतो असे म्हणून दमदाटी केली. याप्रकरणी अमित राठोड विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

# सव्वादोन किलो खोटे सोने ठेऊन ८६ लाखांचा कॅनरा बँकेला गंडा

सुराज्य/सोलापूर

**तब्बल सव्वादोन किलो चक्क खोटे सोने बँकेत ठेवून त्यापोटी सोने तारण कर्ज योजनेतून ८५ लाख ९३ हजार ३०० रुपयांना गंडा घालण्याचा प्रकार सोलापुरातील सराफ सुनील वेदपाठकसह तेरा जणांनी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सोलापुरातील कॅनरा बँकेच्या चार शाखांमधून हा प्रकार केल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी जोडभावी पोलीस ठाण्यात ठकसेन सोनार वेदपाठक याच्यासह तेरा जणांच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला असून याप्रकरणाचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाकडे देण्यात आला आहे.**

- सोलापूरच्या बँकिंग क्षेत्रात खळबळ
- सोने तारण योजनेत चार शाखांची फसवणूक
- सराफ सुनील वेदपाठकसह १४ जण निघाले ठकसेन
- जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल






दरम्यान या घटनेनं सोलापूरच्या बॅंकिंग क्षेत्रात एकच खळबळ माजली असून काही बँकांनी सोने तारण योजनेतून आपल्याकडे असा काही प्रकार झाला आहे का, याची खातरजमा करून घेण्याचं काम तातडीनं हाती घेतल्याचे वृत्त आहे.

विशेष म्हणजे कॅनरा बँकेचा विश्वासघात करून फसवणूक केल्याचा प्रकार सोलापुरात उघडकिस आला आहे. गेल्या १ फेब्रुवारी ते २८ मे या दरम्यान कॅनरा बँकेच्या पश्चिम पेठेसह सात रस्ता, चाटी गल्ली आणि मजरेवाडी या चार शाखांमधून गंडा घातल्याचा हा गंभीर प्रकार घडला आहे. या संदर्भात कॅनरा बँकेचे मुख्य व्यवस्थापक अनिलकुमार बालाजी शहापूरवाड (वय ४४) यांनी याप्रकरणी जोडभावी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

सुनील वेदपाठक या सोनारास कॅनरा बँकेच्या चार शाखांसाठी मानधन तत्त्वावर नियुक्त करण्यात आले होते. सोने तारण कर्जासाठी सोन्याची शुद्धता तपासणे, वजन करणे, त्याबाबत बँकेकडील पासवर्डचा अर्ज स्वहस्ताक्षरात प्रमाणित करून संबंधित सोन्यासंबंधी बँकेस सोने तारण कर्जासाठी शिफारस करून तसे प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी सोनार वेदपाठक याच्याकडे देण्यात आली होती. यादरम्यान सराफ वेदपाठक याने संबंधित इतरांशी संगनमत करून बँकेच्या चार शाखांमध्ये २२५५ ग्रॅम बनावट सोने खरे आहे, असे प्रमाणित करून एकूण ८५ लाख९३ हजार ३०० रुपयांचे सोने तारण कर्ज उचलून बँकेची फसवूणक केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

गोल्ड लोन योजनेसाठी तारण ठेवले जाणारे सोने अस्सल आहे की नाही हे पडताळून त्याचे मूल्य ठरविण्यासाठी कॅनरा बँकेने नेमलेल्या सोनारानेच बँकेचे कान 'टोचल्याचे' उघड झाले आहे. बँकेच्या तिजोरीत तब्बल २२९५ ग्रॅम खोटे सोने भरून या सोनाराने साथीदारांच्या मदतीने ८६ लाखाचा घोटाळा केला आहे. आता याप्रकरणातून सोनार सुनील वेदपाठक 'नॉट रिचेबल' झाला आहे. गोल्ड लोन योजनेसाठी तारण ठेवले जाणारे सोने अस्सल आहे की नाही हे पडताळून त्याचे मूल्य ठरविण्यासाठी कॅनरा बँकेने नेमलेल्या सोनारानेच बँकेचे कान 'टोचल्याचे' उघड झाले आहे. बँकेच्या तिजोरीत तब्बल २२९५ ग्रॅम खोटे सोने भरून या सोनाराने साथीदारांच्या मदतीने ८६ लाखाचा रुपयांचा घोटाळा केला आहे. कॅनरा बँक ७.२५ टक्के व्याज आकारून गोल्ड लोन देते. या कर्जासाठी तारण ठेवल्या जाणाऱ्या सोन्याची पडताळणी करण्यासाठी सोलापुरातील प.मंगळवार पेठ, मजरेवाडी, सातरस्ता, चाटीगल्ली या कॅनरा शाखांमध्ये १ फेब्रुवारी ते २८ मे च्या दरम्यान १३ जणांनी सोनं तारण कर्ज घेतलं आहे.

गोल्ड लोन घेण्यासाठी बँकेत ग्राहक आल्यानंतर सोनारला बोलवले जाई आणि त्याने केलेल्या मूल्यांकनाच्या आधारे सोने जमा करून त्यावर कर्ज दिले जाई. मात्र, झटपट कमाईच्या लोभाने सोनारने गेल्या वर्षभरात आपल्याच १३ परिचितांना खोटे सोने घेऊन बँकेत कर्जासाठी धाडले आणि सोने खरे असल्याचे सांगत, बँकेला ८६ लाखांचे कर्ज देण्याची शिफारस केली.

हे सोनं बँकेनं मानधनावर तपासणीसाठी ठेवलेल्या अधिकृत सराफ व्यावसायिक सुनील नारायण वेदपाठक यांनी खरं असल्याचं प्रमाणपत्र दिलं आहे. एकूण २२५५ ग्रॅम वजनाचं बनावट सोनं सुनील वेदपाठक यांनी प्रमाणित केल्यानं १३ जणांना बँकेनी कर्ज दिलं. ही रक्कम ८५ लाख ९३ हजार ३०० इतकी आहे. बँकेचे मॅनेजर अनिलकुमार बालाजी शहापूरवाड यांनी या संबंधात फसवणुकीचा गुन्हा या प्रकरणी जोडभावी पोलीस ठाण्यांमध्ये १३ जणांच्या विरोधात गुन्हे दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे.

### फसवणूक करणारे १४ ठकसेन याप्रमाणे

**सुनील वेदपाठक, जावेद सय्यद, हुसेन शेख, युवराज ढेरे, कार्तिक सारसंभी, जुबेर मुल्ला, भुजंग शेळके, जयवंत ढेकळे, जैनुद्दीन शेख, सोमनाथ शेळके, सुरेश मुळे, गहिनीनाथ शिंदे, कादिर पठाण, उत्तरेश्वर बोबे अशांचा संशयीत आरोपी म्हणुन समावेश आहे. या प्रकरणी फौजदार पवार पुढील तपास करीत आहेत.**

### मास्टरमाईंड वेदपाठक सराफ 'नॉट' रिचेबल

**कॅनरा बँकेतील साधारण ८६ लाखांच्या सोने तारण घोटाळ्याचा मास्टरमाईंड सुनील वेदपाठक हा सराफ गुन्हा दाखल होताच 'नॉट' रिचेबल झाला आहे.त्याच्या मुसक्या आवळण्यासाठी पोलीस कार्यतत्पर झाले असून त्याला पकडण्यासाठी पोलिसांचा शोध सुरू असून त्यासाठी पोलिसांची पथके रवाना होणार असल्याचं जोडभावी पोलीस ठाण्याच्या सूत्रांकडून सांगण्यात आले.**

## राज्यातील दीड हजार वारकरी दिंड्यांना मिळणार अनुदान

- शासनाचा महत्वपूर्ण निर्णय नोंदणीकृत दिंड्यांना २० हजारांचे अनुदान

**मुंबई** : आषाढी एकादशीनिमित्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पंढरपूरला निघणाऱ्या नोंदणीकृत दिंड्यांना राज्य सरकारकडून २० हजार रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा एक महत्वपूर्ण निर्णय शुक्रवारी घेतला.त्यामुळे वारकरी क्षेत्रातून आनंद व्यक्त केला जात आहे शासनाच्या निर्णयाने महाराष्ट्रभरातल्या जवळपास दीड हजार वारकरी दिंड्यांना अनुदान मिळणार आहे.

वारकरी साहित्य परिषद मंडळाने मुख्यमंत्री शिंदे यांची विधानभवनात भेट घेतली. वारकरी साहित्य परिषद मंडळाच्या शिष्टमंडळाने दिंड्यांना ५० हजार रुपये द्यावेत, अशी सरकारकडे मागणी केली होती. चर्चेअंती मुख्यमंत्र्यांनी २० हजार रुपयांचे अनुदान देण्याचे निर्देश दिले



पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनासाठी महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून शेकडोच्या संख्येने दिंड्या-पालख्या दरवर्षी निघत असतात. या सगळ्या पालख्या पायी चालत आषाढीच्या आधी एक दिवस पंढपुरात पोहोचत असतात.। या प्रवासादरम्यान अनेकदा वारकरी आजारी पडतात, दुखापतग्रस्त होतात, एखाद्या अपघातात किंवा दुर्घटनेत लोकांचा मृत्यू होतो तसेच अनेकांना अनेक कारणांनी वारी करणे शक्य होत नाही. त्यामुळे अनुदान मिळाल्यास त्यांची वारी घडेल, अशी मागणी वारकरी साहित्य परिषदेचे विठ्ठल पाटील यांनी केली होती.

त्याच्या विनंतीला मान देऊन शासनाने २० हजार रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. वारकऱ्यांना शासनातर्फे विमा संरक्षण, गतवर्षी शासनाचा निर्णय पंढरपूरच्या आषाढी वारीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांसाठी शासनातर्फे विमा संरक्षण देणारी 'विठ्ठल रुक्मिणी वारकरी विमा छत्र योजना' लागू करण्याचा निर्णय मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गतवर्षी घेतला आहे. लाखो वारकऱ्यांना यामुळे शासनाच्या खर्चाने विमा संरक्षण मिळणार आहे. वारीच्या ३० दिवसांसाठी हे विमा संरक्षण असेल.

## दोन दिवसांनी ज्ञानेश्वरचा मृतहेद सापडला

**दक्षिण सोलापूर** : कासेगावच्या ओढ्यातील पुलावरून पाण्यात वाहून गेलेल्या ज्ञानेश्वर कदम या तरूणाचा मृतदेह शुक्रवारी सकाळी ओढ्यातील झाडी-झुडपांमध्ये आढळून आला.

ओढ्याला आलेल्या पुरामुळे मंगळवारी मध्यरात्री दुचाकी वरील तिघे वाहून गेले होते त्यापैकी दोघे वाचले पण दुचाकीसह तिसरा कदम हा तरूण वाहून गेला होता. दोन दिवस झाले.त्याचा तपास लागला नव्हता.शुक्रवारी सकाळी पुन्हा शोध मोहिम हाती घेण्यात आली. जिल्हा प्रशासन मार्फत रेस्क्यू ऑपरेशन सुरू करण्यात आले होते. अखेर अर्धा किलोमीटर अंतरावर नवनाथ माने यांच्या बांधाच्या कडेला बाभळींच्या काट्यांमध्ये अडकलेल्या अवस्थेत त्याचा मृतदेह आढळून आला. ज्ञानेश्वर कदमचे चुलते चांगदेव कदम, नामदेव कदम, त्याचा भाऊ तुकाराम कदम, भावजी प्रवीण व महेश गुंड हे सकाळच्या सत्रात शोधण्यासाठी आल्यानंतर साडेनऊ वाजता फक्त डोके वर असल्याचे त्यांना दिसून आले. त्यांनी



ज्ञानेश्वर कदम

गावकऱ्यांशी संपर्क साधला. गावातील युवक प्रविण चौगुले, आण्णा चौगुले, जालिंदर चौगुले, सुरज परीट, अमोल जाधव, वैभव चौगुले, तुषार जाधव यांनी शोध घेतल्यानंतर त्यांनी तातडीने महसूल व पोलीस प्रशासकिय यंत्रणेला कळवून रूग्णवाहिका मागवून घेतली.ओढ्याच्या कडेने काटेरी जोडपे जास्त असल्याने दोन दिवस रेस्क्यू ऑपरेशन करणाऱ्या यंत्रणेला हा मृतदेह दिसला नाही. शेवटी शुक्रवारी पाणी कमी झाल्यानंतर केवळ डोके वर आलेल्या अवस्थेत मृतदेह दिसला. त्यानंतर रुग्णालयात तो शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला.



उजनीच्या भाग्यात उजाडणार नवी पहाट

विशेष वृत्त पान ३ वर

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आरोपी पकडायला जायचंय !

| कल्याण |
|---|
| 359-70-677 |

| मुंबई |
|---|
| 129-22-138 |

# गणवेशाअभावी पावणेदोन लाख विद्यार्थ्यांच्या आनंदावर विरजण

सुराज्य/सोलापूर

**उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर आज यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी शाळा सुरु होतेय. नवा वर्ग, नवं दप्तर, नवे मित्र असं काही सगळं नवंनवं मिळणार असल्यानं विद्यार्थ्यांमध्ये आज शाळेत येण्याबद्दल प्रचंड औत्सुक्य अन् आनंदाचं वातावरण आहे. शाळादेखील विद्यार्थ्यांच्या स्वागताला आतूर झाल्या आहेत. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यात १ लाख ७६ हजार ७११ विद्यार्थ्यांचा हिरमोड झाला आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी गणवेश मिळण्याच्या त्यांच्या आनंदावर विजरण पडणार आहे. विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी गणवेश देण्याचे नियोजन कोलमडले आहे. गणेवशाच्या कपड्याचाच अजून पत्ता नाही तर गणवेश शिवण्याची गोष्ट लांबची. हे विद्यार्थ्यांच्या गणवेशासंबंधीचे वास्तव आहे. शासनाच्या निष्क्रिय व उदासीन धोरणाचा विद्यार्थ्यांना फटका बसला आहे.**

- ड्रेसकोडचे नियोजन कोलमडले
- अद्याप कपड्याचाच नाही पत्ता; ड्रेस शिवून मिळणे तर लांबच
- निष्क्रीय अन् उदासीन कारभाराचा शाळकरी मुलांना फटका

राज्याच्या शालेय शिक्षण विभागाकडून जिल्हा परिषदेच्या इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र, महिला आर्थिक विकास महामंडळाकडे अद्यापही कापड आलेले नाही. तसेच १५ जून रोजी शाळा उघडणार असून शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थी-विद्यार्थिनींना गणवेश मिळणार कसा हा प्रश्न आहे. यंदा गणवेशाविनाच १ लाख ७६



हजार ७११ विद्यार्थी शाळेत पोचणार आहेत. पहिल्या दिवशी गणवेश मिळण्याच्या विद्यार्थ्यांचे स्वप्नावर पाणी फेरले आहे.

राज्याच्या शालेय शिक्षण विभागातर्फे सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत एकसारखा गणवेश देण्यांचे नियोजन उशिरा करण्यात आले असून त्यासाठी कापड विकत घेऊन महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सहकार्याने गणवेश शिवून घेण्याचे ठरवण्यात आले आहे. त्यामुळे शाळा सुरू होण्यासाठी तीन दिवस बाकी असताना अद्याप विद्यार्थ्यांना गणवेश देण्याबाबत शिक्षण विभागाचे नियोजन दिसून येत नाही. यापूर्वी पात्र विद्यार्थ्यांना दोन गणवेश मोफत देण्यात येत होते तसेच शिलाईसाठी प्रत्येकी ६०० रुपये अनुदान दिले जात होते. मात्र, यंदा अनुदानऐवजी थेट कापड पुरवून ते शिवून घेण्याचे नियोजन आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून मोफत गणवेश योजनेच्या माध्यमातून शासनाच्यावतीने सर्व शाळांमध्ये स्थानिक महिला बचत गटांमार्फत शिल्लाई करून एकसमान एक रंगाचे दोन गणवेश उपलब्ध होणार असल्याचे शासनातर्फे जाहीर करण्यात आले होते. या गणवेशाची रचना स्काऊट व गाइड विषयास अनुरूप आहे. पात्र विद्यार्थ्यांना एक रंग, एक दर्जा असलेला सारख्याच गणवेशाचा लाभ देण्याच्या दृष्टीने कापड खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून महिला आर्थिक विकास महामंडळाकडून विद्यार्थ्यांना गणवेश शिवून देण्याचे नियोजन ठरले आहे. मात्र, कापडच नसल्याने यंदा जिल्ह्यातील १ लाख ७६ हजार ७११ विद्यार्थी १५ जूनला शालेय गणवेशापासून वंचित राहणार आहे.

### शासनाकडून अद्याप कापड मिळाले नाही

शालेय शिक्षण विभागाकडून महिला आर्थिक विकास महामंडळाला अद्यापी कापड पुरविण्यात आलेला नाही. त्यामुळे १५ जूनपर्यंत महिला आर्थिक विकास महामंडळ विद्यार्थ्यांना कापड कसे शिवून देणार, असा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शालेय शिक्षण विभागाच्या नियोजनाअभावी स्थानिक शिक्षण विभागाचे नियोजन कोलमडणार आहे.

### अनुदानऐवजी पीफएमएस प्रणाली यापूर्वी शालेय गणवेशासाठी राज्य

शासनाकडून शिक्षण विभागाला अनुदान देवून निधी देण्यात येत होता. मात्र, यंदा अनुदानाचा निधी ऐवजी पीएफ एमएस प्रणालीद्वारे एकाच रंगाचा कापड खरेदी करुन सर्वांना एकसारखा ड्रेस देण्याचे नियोजन करण्यात आले. एका विद्यार्थ्यांच्या ड्रेससाठी ११० रुपयांप्रमाणे महिला आर्थिक विकास महामंडळाला रक्कम मिळणार आहे. तर एक ड्रेस विद्यार्थ्यांना स्वतः शिवून घ्यावा लागणार आहे.

### आठवडाभरात गणवेश देणार

विद्यार्थ्यांना शाळा सुरु झाल्यानंतर वेळेत शालेय गणवेश मिळावा, यासाठी पाठपुरावा सुरू आहे. शासनाकडून मिळाल्यानंतर टेलर करून शिवून लवकरच गणवेश विद्यार्थ्यांना दिले जातील.

\- कादर शेख, शिक्षण अधिकारी,
प्राथमिक विभाग, जिल्हा परिषद सोलापूर